# कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

## शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया माहितीपत्रक

**पदविका /प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्यासाठी खालील कागदपत्रं आवश्यक आहेत.**

| क्र. | अभ्यासक्रम | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|
| १ | मुलभूत (Foundation Diploma in Art & Design) | १)एस.एस.सी. उत्तीर्ण गुणपत्रक,<br>२)शाळा सोडल्याचा दाखला/अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate),<br>३)जातीचा दाखला (Cast Certificate) (राखीव व SEBC प्रवर्गाकरिता) |
| २ | कला शिक्षक पदविका (अे.टी.डी.) | १)एच.एस.सी.गुणपत्रक,<br>२)शाळा सोडल्याचा दाखला/ अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate),<br>३)जातीचा दाखला(Cast Certificate) (राखीव व SEBC प्रवर्गाकरिता) |
| ३ | पदविका अभ्यासक्रम<br>१)रेखा व रंगकला,<br>२)उपयोजित कला,<br>३)शिल्पकला व प्रतिमानबंध,<br>४)अंतर्गत गृहसजावट,<br>५)वस्त्रकाम (टेक्सटाईल),<br>६)मातकाम (सिरॅमिक) | १)एस.एस.सी. उत्तीर्ण गुणपत्रक,<br>२)महाविद्यालय सोडल्याचा दाखला/ अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate),<br>३)जातीचा दाखला(Cast Certificate) (राखीव व SEBC प्रवर्गाकरिता) |
| ४ | कला शिक्षणशास्त्र पदविका (डिप.ए.एड) | १)जी.डी.आर्ट पदविका उत्तीर्ण गुणपत्रक/बी.एफ.ए.उत्तीर्ण गुणपत्रक,<br>२)महाविद्यालय सोडल्याचा दाखला/ अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate),<br>३)जातीचा दाखला(Cast Certificate) (राखीव व SEBC प्रवर्गाकरिता) |
| ५ | आर्टमास्टर<br>(सुट्टीतील/अंशकालीन) | १) कला शिक्षक पदविका (अे.टी.डी) उत्तीर्ण गुणपत्रक,<br>२)प्राथमिक/माध्यमिक शालांत अध्यापन ३ वर्षे अनुभव प्रमाणपत्र,<br>३)महाविद्यालय सोडल्याचा दाखला/ अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate),<br>४)जातीचा दाखला(Cast Certificate) (राखीव व SEBC प्रवर्गाकरिता)<br>**किंवा**<br>१)जी.डी.आर्ट पदविका उत्तीर्ण गुणपत्रक/बी.एफ.ए.उत्तीर्ण गुणपत्रक,<br>२)प्राथमिक/माध्यमिक शालांत अध्यापन ५ वर्षे अनुभव प्रमाणपत्र,<br>३)महाविद्यालय सोडल्याचा दाखला/ अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate),<br>४)जातीचा दाखला (Cast Certificate). (राखीव व SEBC प्रवर्गाकरिता) |

# पदविका /प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्यासाठी खालील पात्रता आवश्यक आहेत

| अ.क्र. | अभ्यासक्रम | पात्रता |
|---|---|---|
| १ | मुलभूत(Foundation Diploma in Art & Design) (१ वर्ष) | १)एस.एस.सी. उत्तीर्ण |
| २ | कला शिक्षक पदविका (अे.टी.डी.)(२ वर्षे) | १)एच.एस.सी. उत्तीर्ण |
| ३ | पदविका अभ्यासक्रम<br>१)रेखा व रंगकला (३ वर्षे),<br>२)उपयोजित कला(३ वर्षे),<br>३)शिल्पकला व प्रतिमानबंध(३ वर्षे),<br>४)अंतर्गत गृहसजावट(३ वर्षे),<br>५)वस्त्रकाम (टेक्सटाईल) (३वर्षे),<br>६)मातकाम (सिरॅमिक व पॉटरी)(३ वर्षे), | १)एस.एस.सी. उत्तीर्ण |
| ४ | कला शिक्षणशास्त्र पदविका (डिप.ए.एड)(१ वर्ष) | १)जी.डी.आर्ट पदविका उत्तीर्ण /बी.एफ.ए.उत्तीर्ण, |
| ५ | आर्ट मास्टर ((सुट्टीतील/अंशकालीन)) (१/३ वर्षे) | १)कला शिक्षक पदविका (अे.टी.डी) उत्तीर्ण,<br>२)प्राथमिक/माध्यमिक शालांत अध्यापन ३ वर्षे अनुभव,<br>**किंवा**<br>१)जी.डी.आर्ट पदविका उत्तीर्ण /बी.एफ.ए.उत्तीर्ण,<br>२)प्राथमिक/माध्यमिक शालांत अध्यापन ५ वर्षे अनुभव, |

# पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी प्रवेश निकष

## कला अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी विहित केलेली अर्हता :-

अ) **मुलभूत अभ्यासक्रम** (Foundation Diploma in Art & Design).

मुलभूत अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यासाठी किमान शालांत परीक्षा (एस.एस.सी.) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. तसेच इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा उत्तीर्ण असल्यास गुणवत्ता यादीचे गुणांकन खालीलप्रमाणे होईल.

१) शालांत परीक्षा प्राप्त गुण + इंटरमिजिएट अे ग्रेडसाठी १० गुण =एकूण बेरीज

२) शालांत परीक्षा प्राप्त गुण + इंटरमिजिएट बी ग्रेडसाठी ०७ गुण =एकूण बेरीज

३) शालांत परीक्षा प्राप्त गुण + इंटरमिजिएट सी ग्रेडसाठी ०५ गुण =एकूण बेरीज

(टिप :- विद्यार्थी महाराष्ट्र राज्याची शालांत प्रमाणपत्र परीक्षा ड्रॉईंग (प्रॅक्टीकल) हा विषय वार्षिक परीक्षेसाठी घेऊन उत्तीर्ण झाला असल्यास गुणवत्ता यादीचे गुणांकन खालीलप्रमाणे होईल.

४) शालांत परीक्षा प्राप्त गुण + शालांत परीक्षेतील ड्रॉईंग (प्रॅक्टीकल) या विषयातील

अे श्रेणीसाठी ०५ गुण = एकूण बेरीज.

५) शालांत परीक्षा प्राप्त गुण + शालांत परीक्षेतील ड्रॉईंग (प्रॅक्टीकल) या विषयातील

बी श्रेणीसाठी ०३ गुण = एकूण बेरीज.

६) शालांत परीक्षा प्राप्त गुण + शालांत परीक्षेतील ड्रॉईंग (प्रॅक्टीकल) या विषयातील

सी श्रेणीसाठी ०२ गुण = एकूण बेरीज.

(टिप:-विद्यार्थी इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा आणि महाराष्ट्र राज्याची शालांत प्रमाणपत्र परीक्षा ड्रॉईंग (प्रॅक्टीकल) हा विषय वार्षिक परीक्षेसाठी घेऊन उत्तीर्ण झाला असल्यास दोन्ही परीक्षांचे श्रेणीनुसार गुणवत्ता यादीमध्ये वरीलप्रमाणे गुणांकन देण्यात यावे.)

**ब) पदविका अभ्यासक्रम :**

**(रेखा व रंगकला-३ वर्षे, उपयोजित कला-३ वर्षे, शिल्पकला व प्रतिमानबंध-३ वर्षे,**

**वस्त्रकला-३ वर्षे, अंतर्गत गृहसजावट-३ वर्षे,मातकाम-३ वर्षे)**

विशिष्ट कला विषयक पदविका अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यासाठी किमान शालांत परीक्षा (एस.एस.सी.) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. शालांत परीक्षा (एस.एस.सी.) मध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे गुवणत्ता यादी तयार करण्यात यावी.

**क) कला शिक्षक प्रशिक्षण पदविका (A.T.D.)**

कला शिक्षक प्रशिक्षण पदविका (नवीन) अभ्यासक्रम हया प्रथम वर्ष वर्गातील प्रवेशाकरिता महाराष्ट्र राज्याची उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (इ. १२ वी) कला, वाणिज्य व शास्त्र यापैकी कोणत्याही शाखेतून उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

तसेच इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा उत्तीर्ण असल्यास गुणवत्ता यादीचे गुणांकन खालीलप्रमाणे होईल.

१) उच्च माध्यमिक शालांत परीक्षा प्राप्त गुण + इंटरमिजिएट अे ग्रेडसाठी १० गुण =एकूण बेरीज

२) उच्च माध्यमिक शालांत परीक्षा प्राप्त गुण + इंटरमिजिएट बी ग्रेडसाठी ०७ गुण =एकूण बेरीज

३) उच्च माध्यमिक शालांत परीक्षा प्राप्त गुण + इंटरमिजिएट सी ग्रेडसाठी ०५ गुण =एकूण बेरीज

**ड) कला शिक्षणशास्त्र पदविका (डिप.ए.एड.)**

रेखा व रंगकला, उपयोजित कला व शिल्पकला व प्रतिमानबंध यापैकी एक चार वर्षाचा पदविका (जी.डी.आर्ट) अभ्यासक्रम उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. **किंवा**

रेखा व रंगकला, उपयोजित कला व शिल्पकला यापैकी एक पदवी (बी.एफ.ए.)अभ्यासक्रम उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

**इ) आर्ट मास्टर (सुट्टीतील/अंशकालीन).**

१)कला शिक्षक प्रशिक्षण पदविका (अे.टी.डी.) उत्तीर्ण व त्यानंतर प्राथमिक/माध्यमिक शाळेत पूर्णवेळ कला शिक्षक म्हणून किमान ३ वर्षे कला विषय शिकविण्याचा अनुभव किंवा

२)जी.डी. आर्ट पदविका/बी.एफ.ए. पदवी उत्तीर्ण व त्यानंतर प्राथमिक/माध्यमिक शाळेत किमान ५ वर्षे कला विषय शिकविण्याचा अनुभव. (शासन निर्णय क्र.एईडी-१४०३/७८५७/(१०१)/तांशि-४, दि. १८ मे,२००४)

भारतीय संविधानानुसार व मंडळ आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार कला विषयक शिक्षण संस्थांत प्रवेशासाठी खालीलप्रमाणे आरक्षण ठेवण्यात यावे. मात्र प्रवेश देताना आरक्षण निश्चिती पेक्षा जास्त होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आणि अनुसूचित जातीतील बौद्ध धर्म स्विकारलेल्या व्यक्ती. | | | १३ % |
| २) | अनुसूचित जमाती | ..... | ..... | ०७ % |
| ३) | विमुक्त जाती (१४ तत्स्म जाती) | ..... | ..... | ०३ % |
| ४) | भटक्या जमाती (जानेवारी १९९९ पूर्वीच्या २८ तत्स्म जाती) | | ..... | २.५ % |
| ५) | भटक्या जमाती (धनगर व तत्स्म जमाती) | ..... | ..... | ३.५ % |
| ६) | भटक्या जमाती (वंजारी व तत्स्म जमाती) | ..... | ..... | ०२ % |
| ७) | विशेष मागास प्रवर्ग | ..... | ..... | ०२ % |
| ८) | इतर मागासवर्गीय | ..... | ..... | १९ % |
| ९) | सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग (SEBC) | ..... | ..... | १० % |
| | | | एकूण | ६२ % |

वर नमूद केलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या आरक्षणाखेरीज राखीव जागांचे आरक्षण ठेवावे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | विद्यार्थीनी (प्रवर्गानुसार) | ..... | ..... | ..... | ३० % |
| २) | संरक्षण दलातील कर्मचा-यांची मुले (जास्तीत जास्त ५ जागा) | | | ..... | ०५ % |
| ३) | अपंग | .... | ..... | ..... | ०५ % |
| ४) | अनाथ | | | | ०१% |

**वरील आरक्षणाव्यतिरिक्त मंजूर विद्यार्थी संख्येच्या १०% अधिकच्या जागा आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातून (E.W.S.) भरण्यात येतील.**

मागासवर्गीयांच्या एखाद्या प्रवर्गातून उमेदवार उपलब्ध न झाल्यास अदलाबदलीने इतर प्रवर्गातून उमेदवार भरण्याची तरतूद करताना अशा त-हेने उपलब्ध मागासवर्गीयांच्या संख्या मुळ आरक्षण + अदलाबदलीने झालेले विद्यार्थी यांची संख्या धरुन आरक्षण निश्चिती पेक्षा अधिक असणार नाही.

महिलांचे ३०% आरक्षण विनाराखीव व राखीव या दोन्ही प्रवर्गांसाठी लागू राहील. तसेच सदरचे आरक्षण हे सध्या विविध सामाजिक प्रवर्गाकरिता विहित केलेल्या संविधानात्मक राखीव जागा अंतर्गत समांतर आरक्षण राहील. उदा. जसे की, सध्या संविधानातील तरतूदीनुसार शासनाने अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता १३% जागा आरक्षित आहेत. त्यापैकी त्यातील ३० % आरक्षण हे अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील महिला उमेदवारांकरिताच ठेवण्यात याव्यात व या प्रवर्गातील किमान पात्रता असलेल्या महिला उमेदवार प्राप्त न झाल्यास त्या जागा अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील पुरुष संवर्गातून भरण्यात याव्यात. अशाप्रकारे इतर सर्व प्रवर्गांकरिता सध्या असलेल्या आरक्षणांतर्गत महिलांना ३०% समांतर आरक्षण ठेवण्यात यावे.

सही/-
(स्मिता किंकळे)
प्र.सचिव,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ,
मुंबई

सही/-
(डॉ.विनोद मोहितकर)
प्र.कला संचालक
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
मुंबई